www.navneet.com
Page No. :
Date : / /

नाशिक

नमस्कार डॉक्टर

मी श्री. शरद रघुनाथ आटाळे. जेव्हा मी कोरोना पॉझिटीव आहे हे मला समजले तेव्हा मी व माझे कुटुंबीय खूप घाबरलो.

कोणत्या डॉक्टरकडे जायचे, कोणते उपचार घ्यायचे याचा गोंधळ चालू होता. ॲलोपॅथी डॉक्टरने तर रिपोर्ट दाखवायला नेला तेव्हाच १-१ गोळ्या सकाळ-संध्याकाळ दिल्या. व मी त्या एक दिवस घेतल्या पण. त्या गोळ्यांनी मी सारखा झोपूनच होतो. यामुळे मुलगी व पत्नी चिंतीत झाले. आमचे शेजारी १० दिवसांपूर्वी कोरोना पॉझिटिव्ह होते त्यांनी घोंगडे डॉक्टरांची ट्रिटमेंट घेतली व ते बरे झाले. मीही डॉक्टरांना ओळखत होतो. त्यामुळे त्यांच्याकडे आलो. मुलगी रिपोर्ट घेऊन आली तेव्हा डॉक्टरांनी प्रथमच सांगितलं की घाबरु नका. १०० % बरे व्हाल. या डॉक्टरांच्या बोलण्याने, विश्वासाने माझी भीती दूर पळाली व माझा विश्वास वाढला. माझे व घरच्यांचे टेन्शन कमी झाले. डॉक्टरांनी दर ५ दिवसांनी औषधे बदलून दिली. व रोज फोनवरही चौकशी करत होते. त्यामुळे कॉरंटाईन असूनही मी एकटा आहे असे वाटले नाही. कारण घोंगडे डॉक्टर माझ्या बरोबर आहेत यामुळे टेंशन एकदमच गेले. मनाने तर मी ५ दिवसातच बरा झालो व त्यामुळे तब्बेतही लवकरच बरी झाली. व नंतरचा रिपोर्ट निगेटिव्ह आला.

आताच्या काळात लॅब, डॉक्टर, ॲम्ब्युलन्स सर्व रुग्णांचा गैरफायदा घेत आहेत. अशा वेळी डॉ. घोंगडे देवासारखे धावून आले. व त्यांनी घरच्या व्यक्तीसारखा धीर दिला, विश्वास दिला. यामुळेच रुग्णाचा अर्धा आजार बरा होतो. बाकीचे अर्धे काम त्यांचे संजीवनी औषध करते. या सर्वांसाठी डॉक्टरांचे मनःपुर्वक आभार !

[signature]

शरद आटाळे
राजेनगर नाशिक.